Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# स्वातंत्र्योत्तर भारतीय परराष्ट्रीय धोरण

**प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे**
सहाय्यक प्राध्यापक,
वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि
बॅ. ए. आर. अंतुले सायन्स कॉलेज,
म्हसळा – रायगड.
९४२११६६६९९९, ८४२१६५४४०२
sanjaybendre927@gmail.com

**प्रास्ताविक :-**

भारताच्या परराष्ट्र धोरणाने स्वातंत्र्यानंतर म्हणजेच १९४७ पासून आकार घेतलेला असला तरी देशाचे परराष्ट्रधोरण कसे असेल हे काँग्रेसने स्वातंत्र्य चळवळ सुरु असतानाच निश्चित केले होते. १९३८ मध्ये काँग्रेसने आपल्या एका ठरवात स्पष्ट केले की, "भारताचे ध्येय आपल्या शेजारी राष्ट्रांशी व अन्य राष्ट्रांशी मित्रत्वाचे आहे तसेच विश्वशांती ठेवून साम्राज्यवादाचा व शोषणाचा अंत करणे हे आहे".

भारताच्या परराष्ट्रधोरणावर पंडित नेहरूंचा प्रभाव मोठा दिसून येतो. किंबहुना तेच त्याचे शिल्पकार होते. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात नेहरू आंतरराष्ट्रीय परीषदांच्या निमित्ताने अनेकदा परदेशात जात असत त्यावेळीच त्यांचे अनेक देशातील नेत्यांशी संबंध प्रस्थापित झाले होते. जागतिक राजकारणात स्वतंत्र भारताची भूमिका कशी राजणार याबद्दलच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट होत गेल्या. १९२२-२३ पासून निरनिराळ्या राष्ट्रात चालू असलेल्या राष्ट्रीय चळवलींना शाब्दिक का होईना, पाठींबाकॉंग्रेसचे ठराव देत होते. इ.स.१९४६ मध्ये आकाशवाणीवर भाषण करताना नेहरू म्हणाले की, "स्वतंत्र राष्ट्र म्हणून आम्ही आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होऊ, आमचे स्वतंत्र धोरण आमलात आणू.दुस-यादेशाची गुलामगिरी आम्ही स्वीकारणार नाही".

**भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची तत्वे / उद्दिष्टे :-**

**१. साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला विरोध** :-

आशिया व आफ्रिका खंडातील बहुतेक राष्ट्रांना युरोपियन देशांच्या साम्राज्यवादाचे बळी व्हावे लागले होते आणि कोणत्या तरी साम्राज्यवादी देशाची वसाहत म्हणून गुलामी व शोषण यांना बळी पडावे लागले होते.[१] भारताने स्व:ताच या साम्राज्यवाडीधोरणाविरोधी म्हणजेच इंग्लंड विरुद्ध लढा देवून स्वातंत्र्य मिळविले होते. त्यामुळे जगाच्या पाठीवर कोठेही साम्राज्यवाद कार्यरत असेल तर त्याला भारताचा विरोध असणार होता. स्वातंत्र्य पूर्व काळात वसाहत असतानाही भारताने या धोरणाचा उच्चार करून आफ्रिका व आशिया खंडातील पारतंत्र्यातील राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची मागणी केली होती. तेंव्हा आता स्वतंत्र राष्ट्र झाल्यावर भारताने असे धोरण स्वीकारणे साहजिकच होते.

**२. देशाचा आर्थिक विकास साधने :-**

देशाची आर्थिक प्रगती साध्य करून घेण्यासाठी नेहरूंनी परराष्ट्र धोरणाचा उपयोग करून घेण्याची ठरविले. स्वतंत्र व लोकशाहीवर त्यांचा प्रचंड विश्वास होता, लोकशाही स्थिर व यशस्वी होण्यासाठी बळकट समाज व अर्थव्यवस्था असणे त्यांना महत्वाचे वाटत होते.[२] त्याकरिता आर्थिकदृष्ट्या दुबळ्या व औद्योगिक दृष्ट्या अत्यंत मागास अवस्थेत असलेल्या भारताला आर्थिक नियोजनाच्या सफलतेसाठी प्रगत व संपन्न राष्ट्रांकडून भांडवल, यंत्रसामग्रीव तंत्रज्ञान यांची मदत मिळणे गरजेचे होते. या मदतीसाठी भारताचे जगातील भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही राष्ट्रांशी मेत्रीसंबंध टिकविणे.

**३. वंशभेदाला विरोध :-**

साम्राज्यवादाप्रमाणेवर्णवंशभेदाचा फटका भारताला बसलेला होता. शेकडो वर्षे भारतीयांनी काळा-गोरा भेद अपमानस्पदरित्या सहन केला.[३] आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रात युरोपीनांनी मोठ्या प्रमाणत वंश भेदाच्या आधारावर अत्याचार केले होते. वंशिक समतेचे तत्व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झालेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र वंश व वर्ण भेदावरून अनेक

राष्ट्रात जुलूमदडफशाहीसुरु होती. वांशिक समता हा मानवाचा एक मुलभूत अधिकार आहे असा नेहरूंचा विश्वास होता, तसेच वंशभेदामुळे संघर्षाची व युद्धाची भावना बळावते असे त्यांना वाटत होते. त्यामुळे भारताने परराष्ट्र धोरणात कोणत्याही प्रकारच्या वंशभेदाला विरोध करण्याचे उद्दिष्टे जाहीर केले.

**४. शांततामय सहजीवन व परस्पर मैत्री :-**

हुकुमशाही असणारे देश आणि साम्राज्यवाद व वसाहतवादाचा पुरस्कार करणा-या देशांना भारताने त्यांच्या या धोरणाला आपला विरोध दर्शविला. मात्र सर्वच राष्ट्रांनी परस्परांशी बंधुत्व, प्रेम व सहकार्याची भावना ठेवल्यास त्यांच्यामधील संबंध चांगले राहतील व युद्धे होणार नाहीत असा नेहरूंचा विश्वास होता.[४] याच हेतूनी त्यांनी मैत्री, सहकार्य, अनाकृमण, प्रादेशिक अखंडता, परस्पर सार्वभौमत्वाचा आदर व शांततामय सहजीवन या पंचशील धोरणाचा नुसता पुरस्कारच केला नाही तर, चीनबाबत हे धोरण त्यांनी आमलात आणले. "जगा व जागु दया" या भारताच्या परंपरागत नीतीचाच ते उद्‌घोष करीत होते. नेहरूंनी सदैव शांतीचा संदेश दिला व जगातही नेला. त्यांची प्रतिमा शांतिदूताची व आंतरराष्ट्रीय शांतता आणि मानवतावादाचा कट्टर पुरस्कर्ता अशीच राहिली.

**५. गटनिरपेक्षता किंवा तटस्थता :-**

भारत स्वतंत्र झाला तेंव्हा दोन गट एकमेकाविरुद्ध उभे ठाकलेले होते. अमेरीकीचा भांडवलशाही गट हा आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी जगातील राष्ट्रांना आपल्याकडे ओढत होता, तर रशियाचा साम्यवादी गट देशांमध्ये साम्यवादी विचारसरणी निर्माण करीत होता. भारताने यापैकी कोणत्याही गटात प्रवेश केला नाही. उलट गटनिपेक्ष धोरण आवलंबून तटस्थ धोरण स्वीकारले. तसेच जगातील तटस्थ राष्ट्रांची संख्या वाढवायला सुरुवात केली. अमेरिका व रशिया यांच्या गटात जायचे नसले तरी त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले त्यांच्याकडून योग्य ती मदत मिळवून देशाचा विकास साधने हि भारताची भूमिका होती.

**६. परदेशातील भारतीयांचे हितसंबंध जोपासणे :-**

आशिया, आफ्रिक, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडातील निरनिराळ्या देशांमध्ये लाखो भारतीय स्थायिक झाले होते. एकोणिसाव्या शतकात प्रमुख्याने आर्थिक कारणासाठी भारतातून ते परदेशी गेले होते.[५] त्यांना जर नागरिकत्वाचे हक्क नाही मिळाले तर ते भारत सरकारकडे मदतीचे आवाहन करीत असत. त्यांना दक्षिण आफ्रिकेतवर्णभेदाच्या कारणावरून तेथील भारतीयांवर होणारा जुलूम आणि सिलोनमध्ये तेथील भारतीयांना राजकीय व नागरिकत्वाचे हक्क देण्यास ते सरकार देत असलेला नकार हे दोन उदाहरणे या संबधात उल्लेखनीय आहे.[६]

**७. संयुक्त राष्ट्र संघटनेस सहकार्य :-**

संयुक्त राष्ट्रसंघ किंवा युनो हे विश्वशांतीसाठी सर्वोत्तम साधन आहे असे भारताचे स्पष्ट मत आहे. जागतिक प्रश्न हे शांततापूर्ण मार्गांनी व चर्चा करून सोडवावेत हे भारताचे तत्व असल्याने त्याचा युनोवर गाढ विश्वास होता. संयुक्त राष्ट्र संघटनेला बाजूला सारून कोणतेही प्रश्न सोडवता येणार नाहीत असे नेहरू म्हणत असे. संयुक्त राष्ट्रसंघ जागतिक राजकारणाचा आखाडा बनू नये असे भारताला नेहमी वाटते व भारताने नेहमीच शांततेसाठी कोरिया व मध्यपूर्वेतील देशात आपले सैनिक व निरीक्षक पाठवले.

**संदर्भ**

१. देशपांडे व.तू. :- स्वातंत्र्योतर भारताचा इतिहास, के.सागरपब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती २०१५, पृ.४६.
२. भामरे जितेंद्र :- आधुनिक भारत. सेठ प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती २००५, पृ.१९४.
३. भामरे जितेंद्र :- पूर्वोक्त, पृ.१९४.
४. देशपांडे व.तू. :- पूर्वोक्त, पृ. ४७.
५. सुमन वैद्य, शांता कोठेकर :- स्वतंत्र भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती २००४, पृ.२१०.
६. सुमन वैद्य, शांता कोठेकर :-पूर्वोक्त– पृ.२१०